महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com website :www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/४९८९** **दिनांक : १२.०२.२०२०**

**प्रति,**
**सर्व मुख्य अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं.मर्या.**
**परिमंडळ कार्यालय.**

**विषय: महावितरण कंपनी अंतर्गत कार्यरत विद्युत अभियांत्रिकी पदवि / पदविका (Degree/Diploma) धारण केलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार देणे ऐवजी प्रतिनियुक्ती देणे बाबत.**

**संदर्भ: मासंवि/रवका/न.क्र.९/२५८८६ दिनांक १६.०९.२०१९.**

महावितरण कंपनी अंतर्गत कार्यरत असलेले तांत्रिक कर्मचारी, ज्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवि / पदविका (Degree/Diploma) ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे अशा कर्मचाऱ्यांना **कनिष्ठ अभियंता** या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सुपूर्द करणे करीता संदर्भित पत्रान्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सुचना निर्गमित करणात आलेल्या होत्या.

क्षेत्रिय कार्यालयांनी संदर्भित पत्रान्वये दिलेल्या सुचनाची अंमलबजावणी करणेस अडचणी होत असल्याचे निर्दशनांस आणुन दिल्याने, या कार्यालयाचे संदर्भित पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/२५८८६ दिनांक १६.०९.२०१९ **रद्दबातल** करण्यात येत आहे.

**आता, सक्षम अधिकारी यांनी शाखा कार्यालय येथील कनिष्ठ अभियंता यांची रिक्त पदे विद्युत अभियांत्रिकीतील पदवि / पदविका (Degree/Diploma) ही अर्हता धारण केलेल्या वरिष्ठ यंत्रचालक व त्यावरील दर्जाचा यंत्रचालक अथवा तांत्रिक कर्मचारी (Line Staff) यांना प्रतिनियुक्ती (Deputation) देऊन भरण्यास मंजुरी दिली आहे. वरिष्ठ यंत्रचालक व त्यावरील दर्जाचे यंत्रचालक अथवा तांत्रिक कर्मचारी (Line Staff) यांना खालील सुचनेनुसार प्रतिनियुक्ती देणेबाबत परिमंडळ स्तरावर कार्यवाही करावी.**

१. प्रतिनियुक्तीस प्रायोगीक तत्वावर एक वर्षाकरीता मंजुरी देण्यात येत आहे.

२. प्रतिनियुक्त कर्मचारी हा वरिष्ठ यंत्रचालक व त्यावरील दर्जाचा असावा किंवा तांत्रिक संवर्गामधील एकुण १५ वर्ष सेवेचा अनुभव असलेला असावा.

३. ज्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवि / पदविका (Degree/Diploma) ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे अशाच कर्मचाऱ्यांना शाखा कार्यालयातील कनिष्ठ अभियंता या रिक्त पदाचा प्रतिनियुक्तीवर कार्यभार सुपूर्द करण्यात यावा. प्रशासकीय कार्यालयामध्ये कनिष्ठ अभियंता यांच्या रिक्त असलेल्या पदांवर प्रतिनियुक्ती करण्यात येवू नये.

४. पात्र कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदावर यशस्वीपणे काम करण्यासाठी संबंधीत दैनंदिन कामकाजाबाबतचे आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

५. प्रतिनियुक्त कर्मचारी यांच्यावर सबंधीत कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रण राहील. प्रतिनियुक्ती कालावधीत कर्मचाऱ्याने वरिष्ठांच्या सल्ल्यानुसार कामे पार पाडावीत.

६. शाखा कार्यालयामध्ये प्रतिनियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याच्या कार्यभाराची दर ३ महिन्याने गुणवत्ता/ परमान/ मापदंड/ कामगिरी /तपासणी अहवाल संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता हे सक्षम अधिकारी यांना सादर करतील.

७. प्रतिनियुक्त कर्मचाऱ्याचा गुणवत्ता/ परमान/ मापदंड/ कामगिरी /तपासणी अहवालाचा संपुर्ण आढावा दर ६ महिन्याने सक्षम अधिकारी घेतील. सदर प्रतिनियुक्त कर्मचाऱ्याचा गुणवत्ता/ परमान/ मापदंड/ कामगिरी /तपासणी अहवाल समाधानकारक असल्यास कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्ती पुढील ६ महिन्यांच्या कालावधीकरिता वाढवण्यात येईल.

८. प्रतिनियुक्त कर्मचाऱ्यांची कामगिरी व वर्तणुक समाधानकारक नसल्यास, तसेच, कंपनीच्या कामाच्या निकडीनुसार देण्यात आलेला प्रतिनियुक्तीवरील कार्यभार सक्षम अधिकारी कोणतीही पुर्वसुचना व कारण न देता केंव्हा ही संपुष्टात/रद्द आणण्यास/करण्यास सक्षम राहतील.

९. प्रतिनियुक्त कर्मचारी हा प्रतिनियुक्तीवर असल्याने तो अतिरिक्त कार्यभत्ता मिळण्यास पात्र राहणार नाहीत. प्रतिनियुक्त कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन व देयके हे त्याच्या मुळ कामाच्या ठिकाणी काढण्यात येईल.

१०. प्रतिनियुक्ती केल्यामुळे रिक्त होणारे यंत्रचालक / तंत्रज्ञ संवर्गातील पद हे तात्पुरत्या स्वरूपात बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यामार्फत प्रतिनियुक्तीच्या कालावधी करिता भरण्यात यावे.

११. प्रतिनियुक्तीवर कार्यभार सुपूर्द केलेल्या कर्मचारी यांना समायोजनाचा कोणताही हक्क असणार नाही.

१२. प्रतिनियुक्ती देण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यावर कुठल्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही प्रलंबीत किंवा चालु नसावी.

१३. या प्रतिनियुक्तीसाठी संबंधीत परिमंडळाचे मुख्य अभियंता हे सक्षम अधिकारी म्हणुन काम पाहतील व तसा कार्यानुपालनाचा अहवाल मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ), सांघिक कार्यालय मुंबई यांच्याकडे सादर करतील.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)** (से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:-**

१. सहा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / कोकण (कल्याण).
२. संचालक (संचलन), म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.
३. प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. पुणे / नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:-**

१. मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु), म.रा.वि.वि.कं.मर्या. एकलहरे, नाशिक.
२. मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ.), म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.
३. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्रशासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेलाबॅटरीजविस्तारीतइमारत,तळमजला,प्लॉटनं.१,धारावीरोड,माटुंगा,मुंबई४०००१९
email :agmhrom@gmail.com website :www.mahadiscom.in
दुरध्वनीक्रमांक:०२२-२४०७७४४१ फॅक्सक्रमांक:०२२-२४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/ № 17326 दिनांक: 20 OCT 2020

E-Mail द्वारे

प्रति,
सर्व मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.
परिमंडळ कार्यालय.

**विषय: महावितरण कंपनी अंतर्गत कार्यरत विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका (Degree/Diploma) धारण करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार देणे ऐवजी प्रतिनियुक्ती देणे बाबत.**

**संदर्भ: १) मासंवि/रवका/न.क्र.९/२५८८६ दिनांक १६.०९.२०१९.**
**२) मासंवि/रवका/न.क्र.९/४९८९दिनांक : १२.०२.२०२०**

उपरोक्त संदर्भीय दि. १२.०२.२०२० च्या पत्रान्वये शाखा कार्यालय येथील कनिष्ठ अभियंता यांची रिक्त पदे विद्युत अभियांत्रिकीतील पदवी / पदविका (Degree/Diploma) ही अर्हता धारण केलेल्या वरिष्ठ यंत्रचालक व त्यावरील दर्जाचा यंत्रचालक/ तांत्रिक कर्मचारी (Line Staff) यांना प्रतिनियुक्ती (Deputation) देऊन भरण्यास मंजुरी दिली आहे. वरिष्ठ यंत्रचालक व त्यावरील दर्जाचे यंत्रचालक अथवा तांत्रिक कर्मचारी (Line Staff) यांना प्रतिनियुक्ती देणेबाबत परिमंडळ स्तरावर करावयाच्या कार्यावाहीबाबत सुचना या पुर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

२. क्षेत्रीय कार्यालयात उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये ज्या सुचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या त्या सुचनांचे अनुपालन होताना दिसुन येत नाही असे सांघिक कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे. सबब, आपणास या पत्रान्वये पुनश्च विनंती करण्यात येतेकी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनेनुसार योग्य ती कार्यवाही करावी व परिमंडळनिहाय प्रतिनियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशिल या कार्यालयास दि. २९.१०.२०२० पर्यंत सादर करावा.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्यमहाव्यवस्थापक(मासं)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:-**
१. संचालक (संचलन), म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.
२.सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / कोकण (कल्याण).
३. प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. पुणे / नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:-**
१. मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु), म.रा.वि.वि.कं.मर्या. एकलहरे, नाशिक.
२. मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ.), म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.
३. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.